# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.11.2024** **वारःगुरुवार**

---

1. गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी विद्यालक्ष्मी योजना
2. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा घेऊन हिंदूंनी एकजुटीनं राष्ट्रविरोधी शक्तींशी लढा द्यावा - योगी आदित्यनाथ यांचं आवाहन
3. महाविकास आघाडीद्वारे लोकसेवेची पंचसुत्री जाहीर
4. महायुतीच्या दहा वचनांसह राष्ट्रवादी काँग्रेसचा जाहिरनामा प्रकाशित
5. पुण्यातील संरक्षण प्रगत तंत्रज्ञान संस्थेद्वारे अधिकाऱ्यांसाठी सहा महिन्यांचं सायबर कमांडो प्रशिक्षण
6. उन्हाळी कांद्याला सरासरी 6 हजार रुपये क्विंटल दर आणि
7. गोवा चित्रपट महोत्सवामध्ये दोनशे आठ चित्रपट फिल्म बाजारमध्ये पाहायला मिळणार

**<u>केंद्रिय मंत्रीमंडळ निर्णय</u>**

गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी केंद्र सरकारनं विद्यालक्ष्मी योजनेला मान्यता दिली आहे. या निर्णयाची माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना तारणमुक्त आणि विना-हमीदार कर्ज मिळण्यास ते पात्र असतील. आर्थिक अडचणींमुळं भारतातील कोणताही तरुण दर्जेदार उच्च शिक्षण घेण्यापासून वंचित राहू नये यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. सरकारनं भारतीय अन्न महामंडळासाठी 10 हजार 700 कोटी रुपयांचं नवीन भांडवल देण्याचाही निर्णय घेतला आहे. एफसीआयची परिचालन क्षमता वाढविण्याच्या दिशेनं हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

**<u>योगी-वाशिम</u>**

छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रेरणा घेऊन एकजुट होऊन हिंदूंनी राष्ट्रविरोधी शक्तीच्या विरोधात लढा द्यावा असं आवाहन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल वाशिम इथं जाहीर सभेत केलं. या वेळी त्यांनी जिल्ह्यातील महायुतीच्या तिन्ही उमेदवारांना विजयी करून देशाच्या विकासात योगदान द्यावं असं आवाहन मतदारांना केलं. तर महायुतीचे राज्यातील सर्व उमेदवार निवडून येणं ही काळाची गरज असल्याचं योगी आदित्यनाथ यांनी अकोला जिल्ह्यात मूर्तिजापूर इथल्या प्रचार सभेत सांगितलं.

**<u>महाविकास आघाडी-नागपूर आणि मुंबई</u>**

महाविकास आघाडीद्वारे लोकसेवेची पंचसुत्री काल मुंबईत वांद्रे इथं झालेल्या संयुक्त जाहीर सभेत प्रकाशित करण्यात आली. शेतकऱ्यांचे 3 लाखापर्यंतचं कर्जमाफ, महिलांना 3000 रुपये महिना आणि मोफत बसप्रवास, बेरोजगारांना 4 हजार रुपये महिना भत्ता, कुटुंबाला 25 लाखांचा आरोग्य विमा अशी वचनं यामध्ये देण्यात आली आहेत. या सभेला काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, यांच्यासह महाविकास आघाडीचे राज्यातले प्रमुख नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

**राहुल गांधी-नागपूर**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी राज्यघटना हे केवळ पुस्तक नसून जीवनपद्धती आणि तत्त्वज्ञान असल्याचं म्हटलं आहे. नागपुरात आयोजित संविधान सन्मान परिषदेत बोलताना ते म्हणाले की, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षितांसह समाजातील सर्व घटकांच्या आशा-आकांक्षा लक्षात घेऊन संविधानाचा मसुदा तयार केला. तत्पूर्वी, गांधी यांनी नागपुरातील दीक्षाभूमीला भेट दिली आणि डॉक्टर आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकावर आदरांजली वाहिली.

**शिंदे**

महायुतीचं सरकार ताकदीनं येणार असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघात शिवसेना महायुतीच्या उमेदवार मनिषा वायकर यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेत व्यक्त केला.

**फडणवीस-सांगली**

पुढील दोन वर्षात शेतकऱ्यांना केवळ मोफत वीज नाही तर 24 तास वीज देता येईल. यासाठी सोळा हजार मेगावॅट क्षमतेचे सौर निर्मिती प्रकल्प सुरू केले असून दोन वर्षात हे प्रकल्प पूर्ण करून शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन होईल असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जत विधानसभा मतदार संघात भाजपाचे उमेदवार आमदार गोपीचंद पडळकर यांच्या प्रचाराचा आरंभ करताना दिलं.

**एनसीपी-जाहीरनामा**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी काल मुंबईत पक्षाचा मतदारसंघनिहाय जाहीरनामा प्रसिद्ध केला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या मासिक रकमेत 600 रुपयांची वाढ करून पात्र महिलांना 2100 रुपये देण्याचं आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसनं दिलं आहे. महायुतीच्या 10 वचनांचा समावेश यात आहे.

**आठवले**

माहीम मतदारसंघात महायुतीचे अधिकृत उमेदवार सदा सरवणकर आणि मानखुर्द शिवाजी नगरमध्ये सुरेश उर्फ बुलेट पाटील यांना रिपब्लिकन पक्षाचा अधिकृत पाठींबा असल्याचं केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत जाहीर केलं. रिपब्लिकन कार्यकर्त्यांना राज्यात सत्तेचा वाटा मिळवून देण्यासाठीच महायुतीला आपल्या पक्षाचा पाठींबा असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**बंडखोर**

भाजप आणि महायुतीच्या उमेदवारांविरोधात बंडखोरी केल्यानं भाजपनं राज्यभरातील आपल्या 40 पदाधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. पक्षशिस्त आणि अनुशासन भंग केल्यानं पक्षातून निष्कासनाची कारवाई करण्यात येत असल्याचं भाजपनं आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**सायबर कमांडोज**

पुण्यातील संरक्षण प्रगत तंत्रज्ञान संस्थेद्वारे गृह मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसाठी सहा महिन्यांच्या निवासी सायबर कमांडो प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालपासून आरंभ केला आहे. भारतभर सायबर संरक्षण क्षमता वाढवण्याच्या सरकारच्या

पुढाकाराचा एक भाग म्हणून हा 'सायबर कमांडोसाठी प्रशिक्षण कार्यक्रम' आयोजित केला आहे. याबाबत अधिक माहिती देणारा हा वृत्तांत...

**भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र, आणि गृह मंत्रालयाच्या सल्ल्यानुसार सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिस दलांमध्ये सायबर कमांडोजच्या विशेष शाखांची स्थापना करुन वाढत्या सायबर धोक्यांना प्रभावीपणे तोंड देण्याची गरज या प्रशिक्षणात विचारात घेतली आहे. विविध सायबर धोक्यांचा सामना करणं आणि राष्ट्रीय सुरक्षितता वाढविण्यासाठी आवश्यक कौशल्यं सहभागींना देऊन सुसज्ज करण्यात येईल. सहभागींना सायबर सुरक्षितता, सुरक्षिततेच्या घटनांचं व्यवस्थापन, जटिल सायबर धोक्यांवर उपाय करण्यासाठी सुसज्जता करणे आणि अनेक क्षेत्रांमध्ये भक्कम संरक्षण यंत्रणा लागू करणे अशा विविध पैलूंचा यामध्ये समावेश असेल. पुण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये सायबर गुन्हेगारांच्या धमक्यांना तसंच शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाला बळी पडून लोक कष्टाचे लाखो रुपये सहजपणे गमवत आहेत. सरकार तसंच सर्व बँकांद्वारे सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचं रक्षण करण्यासाठी वारंवार सूचना दिल्या जातात, सायबर गुन्ह्यांना बळी पडलेल्यांच्या बातम्या सर्व प्रसार माध्यमांमध्ये येत असतात तरीही सायबर गुन्हेगारीचं आव्हान किती मोठं आहे ते सायबर कमांडो प्रशिक्षणातून दिसून येतं. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, सुहास देशपांडे, पुणे.**

**<u>कांदा-नाशिक</u>**

दिवाळी सणामुळं गेल्या आठ ते दहा दिवसांपासून बंद असलेल्या नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचं कामकाज पूर्ववत सुरू होताच नवीन उन्हाळी कांद्याला 6 हजार रुपये भाव मिळाल्यानं बळीराजानं समाधान व्यक्त केलं आहे. यंदा लाल पावसाळी कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात झाली; मात्र ऐन काढणीच्या उंबरठ्यावर परतीच्या पावसामुळं कांद्याचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. परिणामी कांदा विक्रीस उशिरानं सुरुवात झाली. त्यातच बाजार समित्यांना दिवाळीच्या सुट्या असल्यानं शेतकऱ्यांची कांदा विक्रीसाठी अडचण झाली होती.

**<u>मानांकन-परभणी</u>**

परभणी तालुक्यातील नृसिंह पोखर्णी या ग्रामपंचायतीला आयएसओ दर्जा प्राप्त झाला आहे. त्याबद्दल जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाच्या पथकानं गावात झालेल्या विकास कामांची पाहणी केली. ग्रामपंचायतमधील अभिलेख तसंच गावामध्ये होत असलेल्या नवीन बांधकामं आणि जन सुविधा योजनेतील रस्ते बांधकामाची पाहणी यावेळी करण्यात आली.

**<u>वेदघोष</u>**

शंखनाद आणि मंत्रांच्या जयघोषात पुण्यातील वेदाचार्य घैसास गुरुजी वेदपाठशाळा वेदभवन इथं कालपासून विविध धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. वेदपाठशाळेच्या वर्धापनदिन महोत्सवात प्रतिवर्षाप्रमाणं 13 नोव्हेंबरपर्यंत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेदाची 75 पारायणं होणार असून यासाठी वैदिक आणि विविध वेदपाठशाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना निमंत्रित करण्यात आलं आहे.

**<u>वंदेमातरम</u>**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा युद्धघोष असणाऱ्या बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'वंदे मातरम्' या तेजस्वी काव्याच्या निर्मितीचं दिडशेवं वर्ष आजपासून सुरू होत आहे. यानिमित्त भारतीय इतिहास संकलक समितीच्या माध्यमातून

राष्ट्रीय पातळीवर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. या उपक्रमांचा शुभारंभ उद्या पुण्यात 'वंदे मातरम् 150' या अभिवाचनात्मक दृकश्राव्य कार्यक्रमाद्वारे होणार आहे.

**रोड-सायकलिंग**

उत्तराखंडमध्ये पुढील वर्षी जानेवारी-फेब्रुवारीमध्ये होत असलेल्या अडतिसाव्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी पुण्याच्या प्रताप जाधव यांची रोड सायकलिंगकरिता स्पर्धा संचालक म्हणून नेमणूक झाली आहे. या क्रीडा स्पर्धेत सायकलिंग खेळाच्या रोड, ट्रॅक आणि एमटीबी या प्रकारातील स्पर्धा होणार आहेत.

**गोवा-महोत्सव**

गोव्यात 55वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव या महिन्याच्या 20 तारखेपासून सुरू होणार आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवामध्ये अठरावा फिल्म बाजार 24 नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं एका निवेदनात सांगितलं. IFFI 2024 मध्ये दोनशे-आठ चित्रपट फिल्म बाजारमध्ये प्रदर्शित केले जातील. या वर्षी, व्ह्यूइंग रुममध्ये भारत आणि दक्षिण आशियातील चांगल्या दर्जाच्या चित्रपटांची रेलचेल असेल. चित्रपट निर्मात्यांना जागतिक चित्रपट कार्यक्रम निर्माते, वितरक, विक्री एजंट आणि गुंतवणूकदारांशी इथे थेट संपर्क करता येईल. दक्षिण आशियाई चित्रपटांचा आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय बाजारपेठेत प्रचार करणं हा फिल्म बाजारचा उद्देश आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.